*कथा क्रमांक १३*

# किडलेली बोरं

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि पाहते तो काय समोर एक भयंकर सापळा होता. ती एक किंकाळी फोडणारच होती तेव्हा अचानक तिच्या लक्षात आले कि अरे हा तर मोठ्या मुलाचा Halloween चा सापळा. गळ्याशी आलेली किंकाळी तिने तशीच मागे ढकलली आणि ती घरात शिरली.
तिच्या पाठोपाठ कुरिअर वाला आला तो कोर्टाची नोटीस घेउनच. नवऱ्यावर घटस्फोटाची केस ठोकल्यापासून तिचा नवरा पिसाळल्यासारखा मागेच लागला होता आणि आता त्याने अब्रुनुकसानीचा दावा केला होता. कुठून अमेरिकेतून भारतात आलो असे तिला झाले. अमेरिकेत कसा  घटस्फोट हवा असला कि जास्त कटकट नव्हती. इथे आज नवर्याने बायको कशी घरात स्वयपाक करत नसे, चहा मागितल्यावरही तो देत नसे वगैरे आरोप लावले होते. पण आता ह्या सगळ्याची तिला सवय झाली होती, त्यामुळे ती नोटीस बाजूला टाकून दिली.
पुन्हा बेल वाजली. दार उघडले तर दोन्ही मुले घरात भांडतच घुसली आणि त्यांच्या पाठोपाठ शेजारच्या खोपकर बाईंचे आगमन झाले. हिच्या मनात आले आता हि बया पुन्हा डोके खाणार. खोपकर बाईला एरिया मधली BBC म्हणत. कोणाच्या घरी भांडण झाले, कोणाच्या नवऱ्याचे  सेक्रेटरी बरोबर काहीतरी सुरु आहे वगैरे बातम्या हातोहात सगळ्या एरिया मध्ये पसरवण्यात खोपकर बाईंचा मोलाचा वाट होता. पण का कुणास ठाऊक खोपकर बाईला हिच्या बद्दल मात्र थोडा आपलेपणा होता. मागे एकदा रात्री कोणीतरी दार वाजवे आणि उघडावे तर कोणीच नाही असे होत असे, तेव्हा खोपकर बाईंनी चतुराईने सापळा लावून दोन जणांना पकडून देऊन भर चौकात फोडले होते.
तर आज खोपकर बाई आल्या त्या सांगत कि सोसायटी मधे एक नवीन कुटुंब राहायला आलंय आणि त्यांच्या घरात बऱ्याच किमती वस्तू आहेत. खरे तर ती इतकी दमली होती पण चहा पिता पिता हा विरंगुळा बरा वाटला आणि एनीवे BBC ला ऑफ बटण नव्हतेच त्यामुळे ऐकण्याशिवाय काही पर्याय नव्हता. नवीन कुटुंबाचे नाव आफळे आहे असे कळले आणि अचानक ती २५ वर्षे मागे गेली. त्यांच्या वाड्यात त्यांच्या शेजारच्या बिऱ्हाडात आफळे रहात असत.
त्यांच्या घरातील एक म्हाताऱ्या बाई वाड्यातली मुले क्रिकेट खेळत असली आणि त्यांच्या अंगणात चेंडू गेला तर जप्त करत असत. एक नाव काय निघाले ओळखीचे एक आख्खे युगच जणू तिच्यापुढे चित्रपट पहावा तसे डोळ्यासमोरून झळकू लागले. ते आफळे आणि हे नातेवाईक असतील का असा विचार चटकन तिच्या मनात येउन गेला.

येत्या काही दिवसात होणाऱ्या विचित्र आणि हास्यास्पद गोष्टींची मात्र तिला यावेळी काहीही कल्पना नव्हती.

खोपकर बाई बोलत होत्या आणि तिच्या मनाचे खेळ मात्र जोरात चालू होते. कानावर बाईंचा आवाज येत होता पण अर्थबोध मात्र शून्य होत होता. तिला एकदा वाटले की आपण बा.सी.मर्ढेकरांच्या संज्ञाप्रवाहात बुडून चाललो आहोत. एक विचार दुसरीकडे, दुसरा तिसरीकडे नेत आहे. आपल्या विचारांना काही धरबंधच नाही. वाऱ्यावरची पाने जशी सैरावैरा पसरतात तसे आपले विचार खोपकर, आफळे, नवरा, मुले आणि ब.ब.सी. वरून बाउन्स होऊन येत आहेत. या विचारांना पण काही अर्थ नाही. निदान असले फालतू विचार मनात आणून वेळ घालवण्याऐवजी जर खोपकरबाईंचे पुराण ऐकले तर बरं होईल. तिने हातातील चहाचा कप खाली ठेवला आणि खोबा (खोपकरबाईं)कडे पाहिले. ती मनातच हसली. हे शॉर्ट फॉर्म्स मस्त आहेत. खोबा, आफळे बाईला आबा म्हणू, नवऱ्याला नाबा किंवा नबाब आणि मुलांना, काय बरं म्हणावं?

“ अहो, तुमचं लक्ष तरी कुठे आहे? मी इतकी बराच वेळ बडबड करते आहे आणि तुम्ही शून्यात नजर लावून आपल्याशीच हसता आहात. काय चाललंय तरी काय हे?” खोबा तिला विचारत होती.

तिने मान झटकली. चहाचा एक घोट घेतला, खोबांकडे पाहिले, एक दीर्घ सुस्कारा सोडला आणि म्हणाली, “ तुमचं काय बाई, बरं आहे! यजमान फिरतीवर असतात आणि मुलं कॉलेज मध्ये दुसऱ्या गावी शिकतात. दुसऱ्यांना मदत करायला तुम्हाला वेळच वेळ आहे. आमचं तसं नाही बरं. आमच्या नबाबाने आमच्या मागे कोर्ट-कचेऱ्यांचा तगादा लावला आहे आणि नोकरीमध्ये बॉसला खूष ठेवण्यात जीव जातोय.”

खोबाने डोळे बारीक करून तिच्याकडे पाहिले आणि म्हणाली, “ अय्या, म्हणजे तुमचा जीव आता ऑफीसमधे पण share होतो का? बरंच आहे बाई. इथे आमचा जीव देतो म्हटलं तरी कोणी घ्यायला तयार नाही.”

परत आता ह्या जीवाच्या विषयावरून खोबा जीव घ्यायला निघणार इतक्यात दारावरची बेल वाजली आणि ती एकदम दचकलीच. आता कोण आले या वेळी? तिचे हात-पाय अगदी जड झाले होते. खुर्चीवरून उठायची पण ताकद नव्हती तिच्यात. ते पाहून खोबा उठली. दारावरच्या eye_holeमधून पहिलं आणि म्हणाली, “ अय्या, तुमचा जीव आला बरं परत तुमच्याकडे. आता काय मज्जाच मज्जा! मी मात्र आता जाते बरं. नाहीतर तुमच्या जीवात माझा जीव जायचा … ” कुत्सितपणे हसत खोबाने दार उघडलं, बाहेर गेली, धाडकन् दार लावलं.

परत बेल वाजली. आतल्या खोलीतून तिचा मोठा मुलगा ओरडला, “ मॉम, जरा दार उघड ना! बघ कोण बेल वाजवतंय for a long time!”

“ या घरात फक्त मीच एकटीने सगळी कामं करायची. कोणाला इकडची काडी तिकडे करायला नको.” असं स्वतःशीच म्हणत ती उठली, दाराकडे गेली आणि खाडकन् तिने दार उघडलं. समोरचं दृश्य पाहून तिची वाचाच बसली. सगळे विचार थांबले आणि ती शून्य नजरेनं समोर पाहू लागली.

तोच तो तिचा नबाब! तिचा एके काळचा प्राण-प्रिय सखा तिच्यासमोर उभा होता. खांद्यावर लॅपटॉपची बॅग, पायांपाशी एक मोठी चाकांची बॅग, आणि ड्यूटी-फ्री गोष्टींनी खचाखच भरलेली एक मोठी कॅरी बॅग. गोरा रंग, उंच बांधा, गालावरची खळी, कपाळावर येणारी केसांची झुलुपं आणि तोच आत्मविश्वास. तिचा श्वास अडकला आणि पायातली शक्तीच जणू नाहीशी झाली. दाराच्या चौकटीला धरून ती खाली घसरली. तो एकदम पुढे झाला आणि सहजपणे त्याने तिला आपल्या बळकट हातात सावरलं आणि सहजपणे उचलून घेत तिला घरात आणलं. आणि थोड्याश्या जोरात खुर्चीत पटकलं. त्या आघातानं तिला एकदम जाग आली आणि ती ओरडली, “ तू, तू इथे कसा?” “ हे माझं घर आहे. माझं आणि माझ्या मुलांचं. तू जा त्या तुझ्या नटव्या सेक्रेटरीकडे. जा – जा – जा ….”

त्याने तिच्याकडे नेहमीसारखं कीव केल्याच्या नजरेनं पाहिलं आणि म्हणाला, “ अगं, मला काय कबूतर समजतेस की काय! सारखं कबूतर जा जा जा म्हणायला? तुझा नवरा आहे बरं मी अजून. आणि हे घर म्हणशील तर लग्नाआधी मी माझ्या पैशाने घेतलं आहे. तेव्हा बाईसाहेब, मी इथे मनात येईल तेव्हा येऊ आणि राहू शकतो.” “ बरं, ते राहू दे, मुले कुठे आहेत? आणि खायला काय आहे बरं? प्रवासात नुसते पोटाचे हाल झाले आहेत. जरा काही चटक-मटक दे बरं तोंडात टाकायला. " अगदी सहजपणे सोफ्यावर पसरत तो म्हणाला. तिला परत काहीच बोलायला सुचेना.

ती म्हणाली, “ मी तुला सोडून दिलंय. मला नाही माझा नवरा share करायचा. ती नटवी, गोऱ्या कातडीची बाई तुला भुलवते आणि तू तिच्यामागे जातोस गोंडा घोळत. मग माझं काय?”

तो जोरात हसून म्हणाला, “ तू म्हणजे अगदी संशयकल्लोळ आहेस. अगं, जरा एकत्र प्रवास केला आणि आठ दिवसाची टूर सलग केली म्हणजे अगदी शरीरसंगत केली असं नाही. केली (तिचं नाव बरं) आहेच सुंदर. पण ती तिच्या बॉयफ्रेंडसाठी. मला आपली तूच खरी. आणि ही एकदम घटस्फोटाची नोटीस काय धाडलीस बरं? मुलं काय म्हणतील अशा वेळी?” असं म्हणून तो सरळ मुलांच्या आतल्या खोलीकडे चालता झाला.

**कथा क्र. १३-३**

ती हबकली. हा सगळंच हसण्यावारी घेतो आहे की याचा काही गनिमीकावा आहे हेच तिच्या लक्षात येईना. घटस्फोटाचा दावा लावण्यापूर्वी तिला तिची वकील निशा सामंत हिने समजावून सांगितलं होतं की तिचा नवरा तिच्याशी एकनिष्ठ नाही व त्याचे त्याच्या सेक्रेटरीशी संबंध आहेत असा केवळ आरोप करून भागणार नाही तर तो आरोप आपल्याला पुराव्यासह निर्विवाद सिद्ध करावा लागेल. खाजगी डिटेकटिव्ह नेमून आपण हे सिद्ध करू शकू असा आत्मविश्वास तिला तेव्हा वाटला होता. त्यामुळे तिने श्याम चव्हाण हा खाजगी डिटेकटिव्ह नेमला पण त्याने काही ठोस पुरावे हातात देण्यापूर्वीच दावा दाखल करण्याची घाई तिने केली. घाई केल्याचा परिणाम लगेच दिसला. तिच्या दाव्याला प्रत्युत्तर म्हणून नवऱ्याने तिच्यावरच बदनामीचा दावा लावला. तिचा नेहमीचा उतावळा स्वभाव आणि विचार न करता कोठेही घाव घालण्याची वृत्ती यांनी तिला आता मोठ्याच अडचणीत आणून टाकले होते.

नवऱ्याने लावलेल्या बदनामीच्या दाव्याचे पेपर्स तिने वकील निशाला दाखवले तेव्हा तिच्याकडून काही धीर मिळेल व ती काहीतरी मार्ग काढेल अपेक्षा तिला वाटत होती. पण तिने तर तिच्या शिडातली हवाच काढून टाकली. निशा थंडपणे म्हणाली की हे अपेक्षितच होते. घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी निशाने तिला हे सांगितले नव्हते की जर ती नवऱ्यावर करीत असलेला आरोप सिद्ध करू शकली नाही तर तो तिच्याविरुद्ध बदनामीचा दावा करू शकेल. एवढेच पुरेसे नव्हते म्हणून की काय पण त्याहीपुढे जाऊन त्या बयेने आणखी एक मोठाच बॉम्ब तिच्या डोक्यावर फोडला. ती म्हणाली की नवऱ्यावर बद्फैलीपणाचा आरोप शाबित करण्याची जबाबदारी तुझी आहे व तू तो सिद्ध न केल्यास तो खोटा आरोप करून तूच नवऱ्याला क्रूरपणे वागविलेस असा निष्कर्ष कोर्ट काढणार व मग तुला पोटगी वगैरे काही मिळणार नाही. असे सांगून निशा तिच्याकडे अतिशय थंड व कोरड्या प्रोफेशनल अलिप्त नजरेने पाहत बसली तेव्हा तिचा संताप अनावर झाला. नंतर दुसरा मोठा धक्का दिला तो श्याम चव्हाणने. दहा दिवस पाठलाग करून आणि तिच्या नवऱ्यावर पाळत ठेवून त्यने रिपोर्ट दिला की संशयास्पद असे काही दिसत नाही. त्याच्या या रिपोर्टने तिच्या मनातल्या संशयाचं भूत काही उतरलं नाही. पण आता या क्षणी तरी आपण बाजी हरलो आहोत आणि नवऱ्यापुढे अगदी शरणागती पत्करली नाही तरी तात्पुरते का होईना पण गोडीगुलाबीचे नाटक करण्यातच शहाणपणा आहे हे तिने चरफडतच मनाशी मान्य केले.

तेवढ्यात मुलांच्या खोलीतून बापाबरोबर चाललेल्या दंगामस्तीचा मोठा आवाज ऐकून ती तंद्रीतून जागी झाली. पोरंही कशी बेईमान आणि चहाटळ पहा. स्मार्ट असलेला बाप त्यांना जास्त आवडतो. त्या सर्वांवर चिडून डोकं जरा थंड व्हावं म्हणून ती बाहेर पडली तो समोर बहुधा नवीनच आलेल्या आफळेबाई अंगणात काहीतरी वाळत घालायला आलेल्या दिसल्या. त्यांनी हसून विचारले, “ काय साहेब टूरवरून आलेले दिसताहेत ? पोरं चेकाळली आहेत ना त्यांचेशी मस्ती करताना? ”

“ पहाना तुम्हीच. माझं तर डोकं दुखायला लागलं हो त्या आवाजाने” ती म्हणाली. “ अहो या मग दोन मिनिटं. माझा चहा राहिलाच आहे. जरा चहा तरी बरोबर घेऊ या आजच ओळख झाली म्हणून.” आफळेबाईनी आमंत्रण दिले. त्यांचेशी बोलताना त्यांनी सहज याच्या कंपनीचे नाव विचारले. ते हिने सांगताच त्या म्हणाल्या, “ अरेच्या ! माझा भाचा देखील त्याच कंपनीत हेड ऑफिसमध्ये आहे की ! ”. तिचे डोळे चमकले. हा सोर्स चांगला आहे खात्री करून

घ्यायला. याचं आणि त्या केलीचं खरोखर काही अफेअर आहे काय हे यांच्या भाच्याकडून काढलंच पाहिजे आता. उगाचंच त्या फालतू श्याम चव्हाणला फुकटचे पैसे दिले. कोणतीही गोष्ट करताना न चुकता बावळटपणा केलाच पाहिजे हा कसला माझा स्वभाव ? शी !! तिला स्वतःचाच प्रचंड राग आला. “तुमचा भाचा कधी आला इथे तर माझी ओळख द्या हं करून त्याच्याशी” आफळेबाईना सांगून ती निघाली.

घरात पाउल टाकले तर पोरं आणि हा यांची पिझ्झा पार्टी चांगलीच रंगात आलेली ! “ अरे मी खायला मागितलं तर ते न देता तू कुठे गुल झालीस ? शेवटी पोरांनीच  युक्ती काढली आणि पिझ्झा मागवला. ये ना तूपण खायला”.

प्रसाद चटकन् पुढे झाला. नेहाला सावरत म्हणाला, “अगं, किती घाबरली आहेस.  विसरलीस का? कालच मुलांनी हा हाडाचा सापळा दारासमोर लावला होता. तरी सायली चिन्मयला सांगत होती ‘ दादा, मम्मी घाबरेल. आपण ह्या वर्षी Halloween  नको साजरा करूया.'

नेहा ‘ Multiple Personality Disorder’ ची पेशंट होती. गेल्या  दोन वर्षांपासून तिने स्वतःच्या सभोवती अनेक काल्पनिक मंडळी गोळा केली होती. खोपकर बाई, आफळे कुटुंबीय, आफळेंचा भाचा, वकील निशा सामंत, डिटेक्टिव शाम चव्हाण. इतकेच काय तर आपल्या नवऱ्याचे लग्नबाह्य संबंध असणारी त्याची सेक्रेटरी- Kelly ही सुद्धा तिनेच रेखाटलेली व्यक्तिरेखा होती. नेहाच्या डॉक्टरांच्याच भाषेत सांगायचे झाले तर  Neha was living in a severe condition, in which, two or more distinct identities take control of an individual. अगदी त्याचप्रमाणे नेहा कधी खोपकर बाईंबरोबर संवाद साधे तर कधी पंचवीस वर्षांपूर्वीचे शेजारी आफळे कुटुंबियांत वावरू लागे. तिला विशेष त्रास होत असे तो नवऱ्याची सेक्रेटरी Kelly या व्यक्तिरेखेपासून. वकील निशा सामंत आणि डिटेक्टिव चव्हाण यांच्याशी साधलेल्या संवादाने मात्र नेहा अतिशय हतबल व्हायची.

तिची सध्याची परिस्थिती लक्षात घेता डॉक्टर एका निष्कर्षावर पोहचले होते. नेहा अमेरिकेत राहूनसुद्धा तिने तयार केलेल्या सर्व व्यक्तिरेखा आणि रचलेल्या सर्व घटना भारताशी निगडित होत्या. नवऱ्याकडून हवा असणारा घटस्फोट तिला अमेरिकेत सहज मिळाला असता असे वाटत होते.  खोपकर बाई आणि नेहाच्या संभाषणावरून, नेहाचे वास्तव्य एखाद्या चाळीतले असल्याचे चित्रित होत होते. वाडीतील आफळे कुटुंबाच्या आठवणींनी बहुधा नेहा तिच्या बालपणात हरवून जायची. प्रसादने डॉक्टरांना दिलेल्या माहितीनुसार नेहा कुठल्याही खोपकर बाईंना किंवा आफळे कुटुंबियांना ओळखत नव्हती. पण नेहा याविषयी प्रसादजवळ कधीच काही बोलली नसल्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. आणि म्हणूनच डॉक्टरांनी काही दिवसांसाठी नेहाला भारतात घेऊन जाण्याचा सल्ला प्रसादला दिला होता.

नेहा दचकून उठली. "हे मी काय दुःस्वप्न पाहिले? वर्तमानपत्रात माझ्या केस बद्दल लेख?! मला multiple personality disorder चा छापा, माझं हे असं व्यक्तिचित्र ! तरी मी झोपलेच कशी? खूप दमले आहे मानसिक तणावामुळे मी."

स्वप्नंच होतं ते पानभर लेख वालं; त्यातला मजकूर पूर्णपणे बरोबर नव्हता, पण तो स्वप्नातला लेख आठवून ती शहारली. "मी जर आणखीन वेळ घालवला तर हेच दुः स्वप्न खरे होऊ शकते. मला मानसिक आजार आहे असा आरोप करण्यात येऊ शकतो. त्यापूर्वी मी काहीतरी केलंच पाहिजे."

ती जरा दारात अडखळली तर प्रसादने लगेच ढोंग केले होते तिला सावरण्याचे. ती काही सापळ्याला बघून घाबरली नव्हती. पण ती नबाब साहेबांच्या ढोंगीपणाला छान ओळखून होती.

दुसर्या दिवशी ती पुन्हा आफळे बाईंना भेटली. पूर्वी तिचे शेजारी असल्याचे कळल्यामुळे त्यांनी लगेचच भाचा अमित देशपांडे याचा नंबर दिला. नेहा अमितशी बोलली, व मग, "दोन दिवस आईकडे जाउन येते," असं म्हणून प्रसाद वर घर सोपवून अमितला भेटायला प्रसादच्या गावाला गेली.

"वेळेवर गाठलेस तू मला," अमित म्हणाला. "मी सहा महिन्यात शहर सोडून चाललोय. दुसरी नोकरी मिळाली आहे मला."

अमितने तिचे सर्व मुद्दे ऐकून घेतले. वकील निशा सामंतचे मुद्दे पण वाचले. त्यालाही प्रसादचा  स्वभाव बराच नकली व स्वकेंद्रित वाटायचा. अमितच्या मते स्वतःच्या रंग -रूपाबद्दल गर्व होताच प्रसादला. सत्याच्या शोधात त्याने पंचतंत्रातील चाल वापरली. थेट सिंहगुहेत गेला. प्रसादशी त्याने हळूहळू मैत्री वाढवली. एके रात्री पार्टीत थोडंसं पिउन प्रसादने केलीवरचे त्याचे प्रेम, त्याच्या वारंवार होणार्या अमेरिकेच्या फेर्या, त्याचे तिला भेटणे, घरगुती जीवनाच्या रोजच्या कटकटी, त्यांचा त्याला आलेला कंटाळा, हे सर्व सांगितले, व अमितने शांतपणे त्याचे ध्वनिमुद्रण केले.

पुरावा मिळाला होता. ते रेकॉर्डिंग नेहाने निशाला दाखवले. आता आशा दिसू लागली.

पुढच्या आठवड्यात कोर्टात जायचे होते. पुढे काहीही होवो, कोर्ट दुसरे कुठले ही पुरावे मागो, आता मात्र नेहाला चिंता नव्हती. तिची शंका खरी ठरली होती. तिचा आत्मविश्वास वाढला होता. मन हलकं झालं होतं. "जेव्हा आपण सत्यमार्गावर चालतो तेव्हा कसलेही भय नसते. आता लोकांनी कसलाही छापा लावला तरी चालेल, मला स्वतःबरोबरच जगायचे आहे, आणि माझे तर काहीही चुकले नाही." बर्याच दिवसांनी नेहा पुन्हा हसली. अगदी दिलखुलासपणे.

आणि हे सगळं करताना वाटेत कुठेतरी गप्पागोष्टी रंगल्या असताना नेहाला कळले की अमित नेहाच्या जुन्या शेजारी, म्हणजे आफळ्यांच्या घरी, एकदा लहानपणी आला होता. तेव्हा नेहाला व त्याला घरच्या मोठ्या माणसांनी बसवले होते चांगली बोरं निवडायला.

"किडकी बोरे टाकून द्या बरं ! बाहेरून चांगली दिसू शकतात ती," असं सांगितलं होतं त्यांना. आज पुन्हा दोघांनी मिळून तेच केले होते नाही का ? निरखून, चव बघून, गोड फळांमध्ये जे फळ शोभून दिसत नव्हते ते किडके बोरंच काढून टाकले होते ना ?